**मुलींची शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहिल्यानगर या संस्थेची इमारत नुतनीकरण कामांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,**
**शासन ज्ञापन क्र : मंजूरी २६११/२०२६/प्र.क्र.३६/व्यशि-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १८ मार्च, २०२६.

**वाचा :**

१) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र. १४/मालमत्ता/ औप्रसं अहिल्यानगर/प्र.क्र./२०२६/४६, दि. १६.०२.२०२६.

२) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग शासन निर्णय क्र. आयटीआय २०२५/प्र.क्र.८९/व्यशि-३, दि. १६.०५.२०२५

३) वित्त विभाग शासन निर्णय, क्रमांक : क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.२०/०९/२०१९.

४) नियोजन विभाग शासन निर्णय क्र. ससमा २०१०/प्र.क्र.४८ (भाग-१)/का-१४६१, दि. ११ जून, २०१८.

**प्रस्तावना :**

अहिल्यानगर येथे मुलींसाठी नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यासाठी संदर्भाधिन शासन निर्णय क्र. ०२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. मुलींची शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहिल्यानगर ही तात्पुरत्या स्वरुपात शासकीय तांत्रिक विद्यालय, अहिल्यानगर येथे सुरु करण्यासाठी स्थापत्य कामाचे रु. १,७२,५३,०६२/- व विद्युत कामाचे रु. ५५,५२,७८८/- असे दोन्ही कामांचे एकूण रु. २,२८,०५,८५०/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास "मागणी क्र. एच-८, ४२०२, शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यांवरील भांडवली खर्च, ०२, तंत्र शिक्षण, पंचवर्षिक योजनांतर्गत योजना, १०३, तंत्रशाळा, ५३ मोठी बांधकामे (४२०२०६४२)" या लेखाशीर्षाखाली प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचाराधिन आहे.

**शासन निर्णय :**

**१.** संचालक, व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालय यांनी संदर्भाधित क्र. १ अन्वये मुलींची शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहिल्यानगर या संस्थेचे या संस्थेत करावयाच्या स्थापत्य कामाचे रु. १,७२,५३,०६२/- व विद्युत कामाचे रु. ५५,५२,७८८/- असे दोन्ही कामांचे रु. २,२८,०५,८५०/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा शासनास प्रस्तावित केले आहे.

**२.** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे शासन निर्णय क्र. आयटीआय-२०२५/प्र.क्र.८९/व्यशि-३, दि. १६ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अहिल्यानगर जि. अहिल्यानगर येथे मुलींसाठी नवीन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**३.** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहिल्यानगर या संस्थेस तात्पुरत्या स्वरुपात शासकीय तांत्रिक विद्यालयाच्या इमारतीत सुरु करण्यासाठी स्थापत्य कामाचे उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहिल्यानगर यांनी तयार केलेल्या Recapitulation Sheet प्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेली एकुण रु. १,७२,५३,०६२/- (अक्षरी रु. एक कोटी बहात्तर लक्ष त्रेपन्न हजार बासष्ट मात्र) इतकी रक्कम परिगणीत करण्यात आली असून Recapitulation Sheet (A) सोबत जोडली आहे. सदर अंदाजपत्रक हे असून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर; अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहिलयानगर यांनी सांक्षाकीत केले आहे. सदर अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांनी तांत्रिक सहमती दिलेली आहे.

**४.** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहिल्यानगर या संस्थेस तात्पुरत्या स्वरुपात शासकीय तांत्रिक विद्यालयाच्या इमारतीत सुरु करण्यासाठी विद्युत कामाचे कनिष्ठ अभियंता, अहिल्यानगर इलेक्ट्रीक उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर यांनी तयार केलेल्या Recapitulation Sheet प्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेली एकुण रु. ५५,५२,७८८/- (अक्षरी पंचावन्न लाख बाव्वन्न हजार सातशे अठ्ठयाऐंशी मात्र) इतकी रक्कम परिगणीत करण्यात आली असून Recapitulation Sheet (B) सोबत जोडली आहे. सदर अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता, नाशिक इलेक्ट्रीक विभाग, सा.बां.वि. नाशिक; अधिक्षक अभियंता(इ.), सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई यांनी सांक्षाकीत केले आहे. सदर अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांनी तांत्रिक सहमती दिलेली आहे.

**५.** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहिल्यानगर या संस्थेस तात्पुरत्या स्वरुपात शासकीय तांत्रिक विद्यालयाच्या इमारतीत सुरु करण्यासाठी सोबत जोडण्यात आलेल्या Recapitulation Sheet प्रमाणे स्थापत्य कामाचे रु. १,७२,५३,०६२/- व विद्युत कामाचे रु. ५५,५२,७८८/- असे एकूण रु. २,२८,०५,८५०/-(अक्षरी रु. दोन कोटी अठ्ठावीस लाख पाच हजार आठशे पन्नास मात्र) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल :

१) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

२) सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची खातरजमा करण्यात यावी.

३) तांत्रिक मंजूरी देताना राज्य दर सुचीबाह्य बाबींच्या दराकरिता शासन परिपत्रक क्र. २०१७/प्र.क्र.११/नियोजन-३, दि. ११ एप्रिल, २०१७ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) प्रस्तावातील खरेदीशी संबंधित बाबींकरीता ई-निविदा प्रणालीचा अवलंब करुन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दि. २४ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सूचना विचारात घेऊन काम करण्यात यावे.

५) विषयांकित कामाकरीता सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता लागणार नाही. याद्दष्टीने विशेष दक्षता घेऊन काम करण्यात यावे.

६) सदर अंदाजपत्रक सन २०२२-२३ च्या दरसुचीवर आधारित आहे.

७) सदरहू बांधकामासाठी प्राप्त होणा-या निधीचे खर्चाचे उपयोगितता प्रमाणपत्र संस्थेचे प्राचार्य व संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करावे.

**६.** "मागणी क्र. एच-८, ४२०२, शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यांवरील भांडवली खर्च, ०२, तंत्र शिक्षण, पंचवर्षिक योजनांतर्गत योजना, १०३, तंत्रशाळा, ५३ मोठी बांधकामे (४२०२०६४२)" या लेखाशिर्षाखाली सदर स्थापत्य व विद्युत कामासाठी येणारा खर्च सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन भागविण्यात यावा.

**७.** शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.२०/०९/२०१९ अन्वये सुधारीत केलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-पाच, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील अ.क्र.१, परिच्छेद क्रमांक १३४ (१) अन्वये प्रशासकिय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**८.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३१८१७१७०८६९०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AMEY ANIL GAWADE

Digitally signed by AMEY ANIL GAWADE
DN: CN = AMEY ANIL GAWADE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SEEID
Date: 2026.03.18 17:57:10 +05'30'

(अमेय अ. गावडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नाशिक (संचालनालयामार्फत).
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक. (संचालनालयामार्फत).
४. प्राचार्य, शासकीय तांत्रिक विद्यालय, अहिल्यानगर, जि. अहिल्यानगर (संचालनालयामार्फत).
५. सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई (इमारती-२)
६. व्यशि-२ (निवडनस्ती) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय क्र. मंजूरी २६११/२०२६/प्र.क्र.३६/व्यशि-२ सोबतचे RECAPITULATION SHEET (A)

Name of work :- Renovation & Repairs to Govt. Technical High School Building at Ahilyanagar.

## RECAPITULATION SHEET

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | Cost of work portion (A) | : | Rs. | 14340897.00 |
| 2) | Royalty charges (B) | : | Rs. | 126959.00 |
| 3) | Q.C. Testing charges (B) | : | Rs. | 31850.00 |
| | | : | Rs. | 14499706.00 |
| 4) | Add 1% Labour Insurance | : | Rs. | 143409.00 |
| 5) | Add 18% GST | : | Rs. | 2609947.00 |
| | | Total Rs.:- | | 17253062.00 |

AMEY ANIL GAWADE

Digitally signed by AMEY ANIL GAWADE
DN: CN = AMEY ANIL GAWADE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SEEID
Date: 2026.03.18 17:57:22 +05'30'

शासन निर्णय क्र. मंजूरी २६११/२०२६/प्र.क्र.३६/व्यशि-२ सोबतचे RECAPITULATION SHEET (B)

**#REF!** **4055 of 2025-2026 ( PART A TO E )**

**Name of Work :** **Providing Electrical Installations, A.C. Sys., On Line UPS Sys., A & A of Control Panel & L.V. Sys. for Power Electronics Lab, Fashion Designer, Robotics Lab and Theory Dept under Girls ITI at Tech Highschool Tal and Dist Ahilyanagar ( PART A to E )**

| Sr No. | Part | Est No. & Name of Work | Amt |
|---|---|---|---|
| 1 | PART A | ELECTRICAL INSTALLATION | 2528741.96 |
| 2 | PART B | Air Condition System | 943106.40 |
| 3 | PART C | A & A of Control Panel | 198528.60 |
| 4 | PART D | Online UPS System | 643535.00 |
| 5 | PART E | LV System | 210850.00 |
| | | Total Work Portion | 4524761.96 |
| | | Contigency ( 4.00%) | 180990.48 |
| | | G.S.T. ( 18.00%) | 847035.44 |
| | | Grand Total | 5552787.88 |
| | | Say Rs. | 5552788 |

AMEY ANIL GAWADE

Digitally signed by AMEY ANIL GAWADE
DN: CN = AMEY ANIL GAWADE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SEEID
Date: 2026.03.18 17:57:36 +05'30'